संक्षिप्त फौ.प्र.क्र३३६/२०१७
सविता वि. मदन
निशाणी क. २८ वर पुढे सुरू

**फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र. २ शपथेवर निवेदन करतो की,**

**माझे नांव** : **मोनीष जगन शेंदरे**
**वय** : ३१ वर्षे, व्यवसाय : नोकरी
**राहणार** : कन्हान, तहसील पारशिवनी, जिल्हा नागपुर

**सरतपास फिर्यादी-तक्रारदार यांचे अधिवक्ता श्री जी. आर मेश्राम, यांचे मार्फत**

मी बॅक ऑफ इंडिया शाखा हिवरा बाजार येथे शाखा प्रबंधक या पदावर कार्यरत आहे. आरोपी मदनचे आमचे शाखेत खाते आहे. मला साक्ष देण्यासाठी हजर राहणेबाबत साक्षसमन्स मिळाले होते. मला समन्सची कार्बनप्रत दाखविण्यात आली. त्यावर आमचे बॅकेचा शिक्का व कमर्चारी श्री देवेंन्द्र परतेती यांची सही आहे. त्यास नि क्र. २९ देण्यात येत आहे. मी आरोपी मदनचे खात्याचे रेकॉर्ड आणले आहे. दि. ०५.०१.२०१७ रोजी आरोपीच्या खात्यात एकुण रू. ४६,८८३.१२ एवढे शिल्लक होते.

दि. २९.०३.२०१७ रोजी सविता अरूण नेवारे यांनी चेक क्र. ३३५३ त्यांचे खाते क्र ८७३८१०१००००३६२१ या खात्यात जमा केला होता. आता मला नि क्र. २३ दाखविण्यात आला तो तोच आहे. नि क्र. २३ मदन रावण हिवारे यांचा खाते क्र. ८७३८१११००००००११६ चा आहे. चेक वापसी मेमो नि क्र. २४ मला दाखविण्यात आला. कारण क्र. १६ प्रमाणे अपुरी रक्कम असल्याने मदनने दिलेला चेक वटला नाही. नि क्र. २४ वर आमचे बॅकेचा शिक्का व बॅकेचे अधिकारी म्हणुन माझी सही आहे. तो तोच आहे. मी सदर निशाणी क्र. २४सोबत चेक नि क्र. २३ फिर्यादीला अपुरी रक्कम असल्याने परत केला. आरोपी मदन हिवारे आमचे शाखेत कार्यरत होता.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपीचे अधिवक्ता श्री एन.पी. बागडे यांचे मार्फत शपथेवर सुरू**

DISTRICT COURT NAGPUR

दि. २९.०३.२०१७ रोजी आमचे बॅकेचे स्टाफने चेक रिसिव्ह केला होता. तो चेक मी स्वत: रिसिव्ह केला नाही. मी सदर चेक जमा केल्याची पावती प्रकरणात दाखल केली नाही.

नि क्र. २३ चे मागे माझी शाखा अधिकारी म्हणुन सही व बॅकेचा शिक्का आहे. हे म्हणणे खरे आहे की सहीच्या खाली तारीख नाही. साक्षीदार सांगतो की ज्या दिवशी चेक फिर्यादीला मेमोसह परत देतो त्या मेमोवर तारीख असते व तसा शिक्के रद्द केल्याबाबत शेरा चेकच्या मागे लिहिला जातो.

नि क्र. २३ च्या मागे लिहिलेला मोबाईल क्रमांक ज्यांनी चेक जमा केला त्यांचा आहे. नि क्र. २४ वर माझी सही आहे. हे म्हणणे खरे आहे की सही खाली तारीख लिहिली नाही. हे म्हणणे खरे नाही की दि. २९.०३.२०१७ रोजी फिर्यादी सविता नेवारे आमचे शाखेत आली नाही व तीने चेक जमा केला नाही. हे म्हणणे खरे नाही की नि क्र. २४ मी खोटा निर्गमित केला व तो खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की चेक वापसी मेमो नि क्र. २४ मधे नमुद केलेले कारण क्र. १६ अपुरी रक्कम असल्याने चेक वटला नसल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की ०५.०१.२०१७ रोजी आरोपीचे खात्यात रूपये ४६८८३.१२ असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादीचे सांगण्यावरून मी आज खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण</u>**
**<u>फेरतपास नाही.</u>**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्वीकृती | समक्ष |
| (म. सु. बनचरे)<br>न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,रामटेक<br>दिनांक १८.०३.२०१९ | (म. सु. बनचरे)<br>न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,रामटेक<br>दिनांक १८.०३.२०१९ |

DISTRICT COURT NAGPUR